
VOL. 3
SPECIAL ISSUE 1
MARCH 2017

ISSN: 2454-5503
Impact factor : 3.012 (IIJIF)

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL



Special Issue On
## RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS IN PRESENT ERA

(Book I)

*Chief Editor*
**Dr. Shailaja Barure**

*Co Editor*
**Mr. Dhanaji Arya**

BY
GANDHIAN STUDIES CENTRE,
SHRI YOGESHWARI EDUCATION SOCIETY'S
SWAMI RAMANAND TEERTH MAHAVIDYALAYA,
AMBAJOGAI, DIST. BEED - 431517

16-17

SHRI YOGESHWARI EDUCATION SOCIETY'S

SWAMI RAMANAND TEERTH MAHAVIDYALAYA, AMBAJOGAI

(NAAC REACCRIDITED 'B' GRADE)

ONE DAY INTERDICIPLINARY

NATIONAL SEMINAR ON

# RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS IN PRESENT ERA

(24 MARCH 2017)

**PART-I**


CHIEF ORGANIZER

**Dr. Pravin Bhosle**

I/c Principal,

Swami Ramanand Teerth Mahavidyalaya

Ambajogai Dist. Beed

CHIEF EDITOR

**Dr. Shailaja Barure**

Director, Gandhian Studies Centre,

Dept. of Political Science,

Swami Ramanand Teerth Mahavidyalaya

CO EDITOR

**Mr. Dhanaji Arya**

Head Dept. of English

Swami Ramanand Teerth Mahavidyalaya



ORGANIZED BY

**GANDHIAN STUDIES CENTRE,**

**SWAMI RAMANAND TEERTH MAHAVIDYALAYA,**

**AMBAJOGAI, DIST. BEED 431517**

SPONSORD BY

**UNIVERSITY GRANTS COMMISSION,**

**NEW DELHI**

## अनुक्रमणिका....


१. महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार / प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव / १२

२. महात्मा गांधीजींची 'मूलभूत शिक्षण व्यवस्था' -एक विवेचन / डॉ. भालेराव जे.के. / १७

३. महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान आणि भारतीय लोकशाही समोरील आव्हाने /प्रा. डॉ. शैलजा बरुरे / २१

४. ग्रामीण पुर्नबांधणीचा गांधीजींचा दृष्टीकोन/ प्रा.डॉ.घायाळ एस.पी. / ३२

५. महात्मा गांधी प्रणित ग्रामीण विकास / डॉ. पी.आर. थारकर / ३७

६. गांधीजींचे समता विषयक विचार / डॉ रंजनी अनंतराव बोरोळे / ४२

७. महात्मा गांधी आणि महिला सबलीकरण / अमित रामकृष्ण अरगडे / ४७

८. वर्तमानकालीन भारतीय समाजव्यवस्थेत गांधी तत्वज्ञानाची उपयुक्तता / प्रा. सुनिता टेंगसे / ५३

९. महात्मा गांधी आणि त्यांचे कृतिशील विचार : एक अभ्यास / प्रा.राम मायकर / ५९

१०. महात्मा गांधींचे समाजिक विचार / कु.पवार एस.एम. / ६३

११. खादी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग / सौ.कविता अभय पांडे / ६८

१२. Mahatma Gandhi as a social Reformer / सौ.प्रार्थना लोहेकर / ७०

१३. महात्मा गांधीचा ग्रामीण विकासाबद्दल दृष्टीकोन /डॉ.एम.डी. कच्छवे / ७३

१४. महात्मा गांधीजींचा समतेविषयक दृष्टिकोन / प्रा. जोगदंड एम.बी./ प्रा. गंगणे ए. यु. / ७७

१५. महात्मा गांधी आणि महिला विषयक दृष्टीकोन /प्रा.गडदे भारती बा. / ८२

१६. महात्मा गांधींच्या अध्यात्मनिष्ठ मानवतावादी विचारांची प्रासंगिकता / डॉ.नारायण तु.कांबळे / ८८

१७. महात्मा गांधीजींचे कृषी विषयक विचार/ देशमुख विठ्ठल शंकरराव / ९३

१८. महात्मा गांधीजींच्या बुनिवादी शिक्षण पध्दतीची विद्यमान काळातील प्रासंगिकता / डॉ. अरुण दळवे / ९५

१९. महात्मा गांधींचे शिक्षण विषय विचार / प्रा.गंगाधर चव्हाण, प्रा. संजय राठोड / १०२

२०. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि गांधीजी : एक अभ्यास / डॉ.के.व्ही.डोंगरगावकर / १०४

२१. महात्मा गांधीच्या 'खेडयाकडे चला' ऐतिहासिक हाकेचे मराठी साहित्यातील स्थान / प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत / १०९

२२. महात्मा गांधीजींचे ग्रामस्वराज्यविषयी विचार / प्रा. घाडगे गौतम व्य. / ११३

२३. गांधीजींच्या सत्याग्रहाची साधणे / श्रीमती एस. एन. जाधवर / ११९


Late Ramesh Warpudkar College Sonpeth Parbhani

Late. Ramesh Warpudkar College
Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

## ८.

# वर्तमानकालीन भारतीय समाजव्यवस्थेत गांधी तत्वज्ञानाची उपयुक्तता

**प्रा. सुनिता टेंगसे,**
समाजशास्त्र विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

आधुनिक काळातील एक थोर विचारवंत म्हणून गांधीजींचा गौरव आज सर्वच स्तरावर होत आहे. १९२० ते १९४७ असे २७ वर्ष स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व गांधीजींनी केले,ते खऱ्या अर्थाने राष्ट्रपिता होते. गांधीजींचे कट्टर राजकिय विरोधक सुभाषचंद्र बोस यांनी देखील The father of Nation म्हणून गांधीजींना प्रथम संबोधीत केले. रविंद्रनाथ टागोरांनी गांधीजींच्या अफ्रिकेतील कार्याचे कौतुक करतांना त्यांना महात्मा (Great Soul) ही पदवी दिली. १९१५ ते १९४८ या कालावधीत गांधीजी आपल्या कर्तृत्वाने महात्मा बनले म. गांधीजींनी आपले विचार मांडतांना विशेष एका घटकावर लक्ष केंद्रित केले नाही तर त्यांचे विचार सर्वस्पर्शी होते. 'त्यांनी आपल्या समाजपुर्नरचनेचा दृष्टिकोन स्पष्ट केला तोच गांधीवाद म्हणून ओळखला जातो.' गांधीजींनी समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था, कुटूंब, जात वर्गव्यवस्था, दलितांचे प्रश्न, शिक्षणपध्दती,औद्योगिकरण, नितीमत्ता अशा कितीतरी विषयांवर आपले विचार समाजासमोर प्रस्तुत केले. सामान्यांचे अधिकार व न्याय प्राप्त करण्याचे प्रभावी शस्त्र म्हणजे गांधीवादी दृष्टीकोन होय. जसे विचार तसे आचार हा सिध्दांत माननारे व आवलंबणारे म. गांधी निश्चित कर्मयोगी होते. 'वैष्णव जन तो तेने कहीए जे पीर पराई जाने रे ' हे भजन ऐकल्यानंतर, एक असे व्यक्तिमत्व समोर येते जे प्रत्येक व्यक्तिच्या मनात विचारात अदभूत शक्ती प्रवेश करत असल्याची अनुभूती देते."गांधी नावाचा कोणी माणुस या भुतलावर होवुन गेला यावर येणाऱ्या पिढ्या विश्वास ठेवतील का नाही." अशी शंका व्यक्ती करणारे जगप्रसिध्द शास्त्रज्ञ अलबर्ट आईन स्टाईन यांचे म्हणने खरे वाटते कारण की इतकी भयानक परिस्थती भारतात निर्माण झाली आहे. गांधी नावाचा मानुस, गांधी नावाचा विचार भारताच्या भुमीत उगवला, वाढवला पण विस्तारला भारता बाहेर, म्हणुनच तर गांधी जयंती युनोने 'जागतीक अहिंसा दिन' म्हणून साजरी करण्यास सुरुवात केली. गांधीजी केवळ एक असामान्य व्यक्तीमत्व होते. त्यांचा वारसा त्यांच्या विचारातून व कृतीतून टीकवून ठेवला, गांधी एक सत्य गांधी एक कला व शस्त्र, गांधी एक प्रयोग, गांधी एक जीवन मार्ग, गांधी म्हणजे नि:शस्त्र सैन्याचा सेनापती ज्यांनी सशस्त्र ब्रिटीश सैन्याला अहिंसेच्या बळाने पराजीत केले. गांधीजी हे एकमेव व्यक्ती होते ते कशालाच भीत नसत पण सारे गांधीजींना भीत

असता. एक अदभुत गोष्ट गांधीजी जवळ होती ती म्हणजे सत्य आणि उच्च मनोबलही गांधीजींची शक्ती होती.

सद्यस्थितीत जगाचा, समाजाचा, राष्ट्राचा, व्यक्तीचा विचार केला तर मोठ्या प्रमाणात भय, चिंता, असुरक्षितता, अस्थिरता, विषमता, दारिद्र्य, पिळवणूक, शोषण, अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, गुन्हेगारी यांनी व्यक्ती, समाज, राष्ट्राच्या जीवनात आपला घातक प्रभाव निर्माण केला आहे. आधुनिकीकरण, विकास ह्या गोंडस संज्ञांनी बेकारी, परस्परावलंबन, गरिबी, दारिद्र्य, विषमता, अनिती, चंगळवाद,श्रमप्रतिष्टेचा लोप, मुल्यहिनता, व्यसनाधिनता, लिंगभेद, स्त्रीभ्रूणहत्या आदींना हातभार लावण्याचे काम केले. खेड्याकडे सातत्याने होणारे दुर्लक्ष, ओस पडत जाणारी खेडी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढत जाणारा नक्षलवाद, प्रांतवाद, भाषावाद, दहतवाद, पर्यावरण वाद, तत्वहीन राजनीती, जात,धर्माचा राजकारणातील वापर, आर्थीक साम्राज्यवादात भरडत जाणारा सामान्य मानुस, नोकरशाही व नेते शाहीच्या संगनमताने बळावत जाणारा भ्रष्टाचाराचा भस्मासूर, आरोग्य सुविधांचा अभाव, शिक्षणाचे बाजारीकरण, न्यायप्राप्तीतील विलंब, लोकशाही ऐवजी बळावत जाणारी पक्षशाही अशा अनेक सामाजीक प्रश्नांनी भारतालाच नव्हेतर अनेक विकसीत, विकसनशील देशातील संस्कृती, समाजकारण, राजकारण, अर्थकारणाला पोखरुन काढले आहे.अशा स्थितीत विश्वातील सर्व मानवीहितांचा ध्यास घेवुन नवसमाज निर्मीतीसाठी दिव्य मानवतावादी तत्वज्ञानाची केवळ भारतालाच नव्हे तर विश्वाला गांधी तत्वज्ञानाची आवश्यकता आहे. गांधीवादी तत्वज्ञान आत्मशांती पासुन विश्वशांतीपर्यंत गावापासुन विश्वापर्यंत, शांतीसाधक अहिंसेपासुन क्रांतीकारक अहिंसे पर्यंत म. गांधीजींचे विचारधन मानवी जीवनाचे प्रेरणास्थान बनले आहे.

म. गांधी सत्य, अहिंसा, सत्यागृह, अपरिगृह, ग्रामराज्य, चरखा, खादी, नैतीकता, आधात्म, सर्वोदय, हिंदस्वराज्य या अभिनव विचारांचे प्रतिक होते. सुसंवाद, शांतता, अहिंसा या मार्गानेच मानव आणि सबंध जग सुखी होवू शकेल हे गांधी तत्वज्ञान आता सर्वांनी मान्य केले आहे आणि त्यांनी दाखवलेल्या विचार पथावर संपुर्ण जग मार्गक्रमण करीत आहे. गांधीजींच्या वैचारीक महात्म्यामुळे त्यांच्या विचारांची संमोहीनी अलबर्ट आइन स्टाईन पासून ते रिचर्ट ॲटन बरो पर्यंत रविंद्रनाथ टागोरापासुन ते विनाबा भावेपर्यंत, मार्टीन ल्युथर किंगपासुन ते नेल्सन मंडेला पर्यंत, ॲनसॅन स्यु की, बराक ओबामा पर्यंत गांधी तत्वज्ञानाचे प्रभावित झाले आहेत. म. गांधीच्या निधनाला ६५ वर्ष होऊन गेले तरीही त्यांच्या विचारांचा प्रभाव भारतातच नव्हे तर संपूर्ण जगावर दिसून येतो. २० व्या शतकातील गांधीवाद २१ व्या शतकात कितपत प्रासंगीक आहे या संदर्भात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विचारपीठावर मंथन होताना दिसून येत आहे. महात्मा

गांधीचे तत्वज्ञान वर्तमानकाळात प्रासंगीक नाही तर जगात निर्माण झालेल्या विविध समस्यांचे उत्तर आहे असेच म्हणावे लागेल.

**संशोधन पध्दती :-** 'वर्तमान कालीन भारतीय समाजव्यवस्थेत गांधी तत्वज्ञानाची उपयुक्तता' या शोध निबंधा करिता माहिती संकलन व विश्लेषण पध्दतीचा अवलंब करुन, संशोधन विषयाशी संबंधीत माहिती संकलनासाठी व्दितीयक स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. ज्यामध्ये विविध संदर्भग्रंथ, मासिके, विशेषांक, वर्तमानपत्रातील लेख, स्मरणीका, इंटरनेट, आदिंच्या आधारे शोध निबंधाची मांडणी केली आहे.

**अभ्यासविषयाची उद्दिष्ट्ये :-** 'वर्तमान कालीन भारतीय समाजव्यवस्थेत गांधी तत्वज्ञानाची उपयुक्तता' या शोध निबंधचा उद्देश गांधी तत्वज्ञानाचा अभ्यास करणे व भारतातच नव्हे तर जगात गांधी तत्वज्ञनाची उपयुक्तता स्पष्ट करणे.

**स्वराज्याची कल्पना:** आधुनिक काळातील श्रेष्ठ मानवतावादी म्हणून म. गांधीचा उल्लेख केला जातो. त्यांनी जी स्वराज्य संकल्पना मांडली तीचा मार्गही सत्य, अहिंसा, मानवतेतुनच जातो, त्यांनी स्वराज्य म्हणजे बाह्य बंधनातून व मानसीक गुलामगीरीतून मुक्ती अशी व्याख्या केली. गांधीचे स्वराज्य केवळ राजकीय नाही तर आर्थीक स्वातंत्र्य व समानतेशी निगडीत होते. त्यांनी राजसत्ता ही विकेंद्रीत असावी असा आग्रह धरला. त्यांचा भर ग्रामसभा बळकट करण्यावर होता. गांधीच्या मते सत्ता ही पिरॅमिड असावी जास्तीत जास्त सत्ता गावाकडे असावी, तालुका, जिल्हा, राज्य व राजधानी अशी सत्ता कमी कमी होत जावी. खेड्यांना जास्तीत जास्त अधिकार असावेत, सत्ता ही लोकांच्या हाती असावी, लोकशक्ती ही सार्वभौम असावी, स्वराज्यात सर्वजन शक्तीशाली बनतील, गरीब, श्रीमंत, सुशिक्षीत-अशिक्षित यांच्यात भेदभाव करता कामा नये. गांधीजींनी स्वराज्याची संकल्पना विशद करण्यासाठी १९०९ मध्ये हिंदस्वराज्य नामक पुस्तक लिहीले. हिंद स्वराज्यात सर्व हिंदी लोकांचे राज्य असेल. वंश, धर्म, जात, लिंग, संपत्ती या आधारे भेदभाव केला जाणार नाही.

**जॉन मिडलटन मरी** यांनी म्हटल्या प्रमाणे आधुनिक जगात लिहीलेल्या पुस्तकात हिंदस्वराज्य सर्वात महान पुस्तक असुन मी याला जगातील आध्यात्मिक ग्रंथापैकी एक महाग्रंथ मानतो. या पुस्तकात म. गांधीनी स्वराज्य, सभ्यता, हिंदुस्थानची दशा व दिशा, हिंदु-मुसलमान, शिक्षण, वकील, डॉक्टर, रेल्वे, शस्त्रबळ, सत्याग्रह, आत्मबळ, यंत्रे या अनेक विषयावर आपले मौलिक विचार मांडुन त्यांचे हिंदु स्वराज्य कसे असावे या बाबत विस प्रकरणामध्ये विचार प्रसार पुस्तकात मांडले आहेत. मानवजातीच्या विकासाचा शाश्वत मार्ग म्हणजे गांधी विचार होय हिंद स्वराज्य नव्या युगाची संजिवनी आहे. गांधींचा [illegible]

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

आधात्म यांच्या समन्वय करुन स्वराज्यांची कल्पना मांडली जी विकासाबरोबर नितीमुल्यांना पाठबळ देणारीच मानवी लागेल आणि आज याचीच गरज मानवी समाज जीवनात प्रकर्षाने जाणवते आहे.

**सर्वोदय संकल्पना :** सर्वप्रथम रस्कीन यांनी 'अन टू दिस लास्ट' या पुस्तकात ही संकल्पना मांडली. याव्दारे त्यांनी सर्वाचा विकास झाला पाहीजे हा मुलगामी विचार मांडला, परंतु म. गांधीनी सर्वच लोकांचा सोबत विकास झाला पाहीजे यामताचा आग्रह धरला. सर्वोदयी समाजात गरीब-श्रीमंत, दलित-सवर्ण हा भेदभाव असणार नाही. सर्वलोक समान असले पाहीजेत कारण संपत्तीमुळेच संघर्ष होतो. गांधीची सर्वोदय संकल्पना ही जमीहीन, शोषणहीनतेशी संबधीत होते. खऱ्या अर्थाने भारतात लोकशाही प्रस्थापीत करावयाची असेल तर भारतातील सामान्य व्यक्तीला आपण शासक आहोत असे वाटले पाहीजे.

{xe "ÂOÉÉ¨É°´É®úÉVªÉ"}**ग्रामस्वराज्य :** खेडे विकसीत झाले तरच देशाचा विकास होइल असे म. गांधीचे मत होते. गावात शाळा, धर्मशाळा, दवाखाना, प्रार्थनास्थळे, सार्वजनीक हॉल, करमणुकीच्या सोयी, खेळाची मैदाने, मुलभुत शिक्षणाची सोय असावी. गांधीजींच्या ग्रामस्वराज्यात नाल्यांची व्यवस्था, पीण्याच्या पाण्याची व्यवस्था, दिवाबत्ती ची व्यवस्था असावी. अन्न वस्त्र निवारा बाबतीत खेडे स्वयंपुर्ण असावीत, समृध्द असावीत. गांधीच्या ग्रामस्वराज्यानुसार ग्रामीण विकासाचे साठी ते आंदर्श मॉडल होते. म. गांधीच्या मते खेड्याच्या अधोगतीस अज्ञान, पोषक अहार, सार्वजनीक स्वच्छता हे तीन घटक जबाबदार आहेत. आज शासनाकडुन स्मार्टसीटीसाठी कराडो रुपये खर्च केली जात आहेत व खेड्यांच्या विकासाठी समग्रविकास योजना आखण्याची व ती प्रत्यक्षात कृतीत आणण्याची गरज आहे.

**शिक्षणसंबधीत विचार :** गांधीजींनी मानवतावादी दृष्टीकोणातून शैक्षणीक तत्वज्ञान मांडले. त्यांच्यामते खरे शिक्षण तेच जे मानसाला माणुस बनवते, उद्योग देते, चारित्र्य संपन्न बनवते. त्यांनी शिक्षणाला साध्य न मानता साधन मानले. शरीर, बुध्दी व मन यांचा समतोल विकास साधनारे ते एक प्रभावी साधन आहे. शिक्षणाव्दारे होय सर्वसामान्यांना स्वातंत्र्य, समता बंधुता याचे ज्ञान मिळते. त्यांना शिक्षकांकडुन खुप अपेक्षा होत्या. शिक्षकच प्रेम, सहानुभूती, सत्य, सहिष्णुता निर्माण करण्याचे काम करतो असे ते म्हणत. गांधीजींनी बाळल शिक्षणासाठी 'नईतालीम' ही योजना आखली, त्यांनी प्रौढशिक्षण व स्त्रिशिक्षणाला चालना दिली व विश्वविद्यालयीन शिक्षणाचे महत्व विशद केले. म. गांधीनी शिक्षणासंदर्भात मानवतादी मुलभूत विचार मांडले आजच्या शिक्षण प्रणालीतील दोष पाहता आजचे शिक्षण केवळ शिक्षणच राहीले आहे, त्याचा व्यवहाराशी, व्यवसायाशी, कौशल्याशी, नितीमुल्यांशी कसलाही संबध दिसुन येत नाही. आज

शिक्षणाचाही बाजार मांडला जात आहे. कमीही पदव्या हाताशी असुन वशील्याशिवाय नोकरी मिळणे कठीण झाले आहे. तसेच समाजात वाढत जाणारी महिला असुरक्षीततेची भावना दुर करण्यासाठी नैतीक मुल्यांची रुजवण बाळमनावर होणे अत्यंत आवश्यक आहे तरच मुली व स्त्रीयांचे जीवन सुखी, शांत व सुरक्षीत बनेल आज गांधीजींच्या बुनियादी शिक्षणाची नितांत गरज आहे.

**विश्वस्त संकल्पना व आर्थीक समानता:** आज देशात श्रीमंत भांडवलदार वर्गाकडून सामान्य जनतेची पिळवणूक मोठ्या प्रमाणात होत आहे. देशात श्रीमंताकडे अनावश्यक संपत्तीचा साठा खुप मोठया प्रमाणात आहे, तर दुसरीकडे करोडो लोक आपल्या दैनंदिन गरजा भागवू न शकल्यामुळे असंतुष्ट, असमाधानी आहेत यासाठीच गांधीजीनी विश्वस्त संकल्पना मांडली होती त्यात त्यांनी श्रीमंत व भांडवलदार वर्गाने स्वतःच्या गरजेपुरती संपत्ती ठेवुन जास्त असणारी संपत्ती सर्वाच्या सुखासाठी खर्च करावी. आणि विश्वस्त वृत्तीशिवाय देशात आर्थीक समता निर्माण होणारे नाही.आज देशात अनेक व्यक्तीचे स्वीस बँकेत खाती आहेत. आणि कोट्यावधी अब्जावधी रकमा जमा आहेत आणि ही धनसंचय वृत्ती कमी न होता दिवसेंदिवस वाढत आहे परिणामी सामान्य जनता मुलभूत गरजा भागविण्यासाठी असमर्थ आहे.

आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानामुळे आज जग जवळ येत आहे. पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव भारतीयांवर पडत आहेत. भारतीय समाज पाश्चात्य संस्कृतीचा गुलाम बनत आहे. म. गांधीच्या तत्वज्ञानाकडे दुर्लक्ष करुन भारतीय नागरीक पाश्चात्य संस्कृतीचे पाईकच बनले आहेत. गांधीजींनी त्यांच्या विचारांच्या आधारे मुल्य, विकास, शांतता, निभर्यता, सहकार्य, त्याग, आत्मबलीदान, सत्य, मानवता, नितीधर्म, श्रमप्रतिष्ठा, या सारख्या विविध संकल्पना मांडल्या.

गांधीजींनी मुल्यव्यवस्था मुल्याच्या आधारे मांडली त्यातील सत्य याव्दारे भ्रष्टाचारावर अंकुश बसुन शासन व्यवस्था सक्षम व पारदर्शी बनवता येईल. सर्व कारभार पारदर्शी बनवल्यासाठी निर्भयतेची गरज आहे. नितीधर्म व मानवता या व्दारे सहकार्य शिलता रुजवता येईल बेकारी कमी करण्यासाठी श्रमप्रतीष्ठा मुल्यांची गरज आहे. अहिंसे व्दारे समाजातील हिंसाचार अत्याचार, आनाचार रक्तपिपासुवृत्ती यावर अंकुश ठेवणे शक्य होईल. मानवता वादा व्दारे माणुसकीची भावना वाढीस लागेल,नितीधर्म याव्दारे व्यक्ती व समाज सदवर्तनी बनेल. आत्मबलिदाना व्दारे स्वतःचेच नव्हे, तर देशाचे रक्षण करणे शक्य होईल. त्यागा व्दारे व्यक्ती स्वकेंद्री न बनता परहिताचा विचार करु लागेल. यातून सामाजिक स्वास्थ अबाधीत राहुन पारस्पारीक भेद गळून पडेल व शांतता प्रस्थापीत होऊन भारतीय समाजाच्या विकासाला योग्य दिशा व गती मिळेल यात शंका नाही.

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

**सारांश :** महात्मा गांधीनी सांस्कृतीक, सामाजीक, राजकिय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्राविषयी अत्यंत प्रभावी विचार मांडले आहेत. म. गांधीच्या गुणवैशीष्ट्यांना एकत्र सामावू शकणारी संज्ञा त्यांना संबोधून वापरणे शक्य होत नाही. बाबा आमटे यांनी म्हटले आहे की, "महात्मा गांधीचे महात्म्य सांगुन गांधी सांगता येणार नाहीत. उद्याच्या पिढ्यांना त्यांची ओळख पटण्यासाठी कदाचीत कॉम्पुटर लागेल, पण काळाच्या भाळावर उमटलेली ही तप्त युगमुद्रा कोणत्या इतिहासाला पुसता येणार नाही."म. गांधीच्या विचारांचा आधार घेऊन आण्णा हजारे, मेधा पाटकर, सुंदरलाल बहुगुणा, बाबा आमटे, डॉ. अभय बंग या असंख्य व्यक्तिंनी म. गांधीच्या विचारांनी प्रेरीत होऊन समाजासाठी स्वतःला वाहुन घेतात. या सामाजिक कार्य करणाऱ्या असामान्य व्यक्तिमत्वाला सर्वसामान्य मानुसही झुकुन सलाम करतो यातच म.गांधीच्या विचाराचे सामर्थ दडलेले आहे.

**संदर्भ सुची -**


१. भारतीय सामाजिक विचार, प्रा.पाटील, प्रा.चव्हाण, फडके प्रकाशन, कोल्हापुर पा. १२५,१२६.
२. प्रमुख राजकीय विचारवंत, डॉ. ना.य.डोळे, विद्या बुक्स पब्लिश, पा. ६४,६५,६६.
३. आजादी के पचास साल, भाग २ विश्वप्रकाश गुप्त, माहेनी गुरु, राधा पब्लीकेशन, नई दिल्ली, पा. २५,२६,२७.
४. गांधी का सामाजीक चिंतन, डॉ. मिश्र, डॉ. दाधीच, अर्जुन पब्लीशिंग हाऊस, पृ. ६१, ६२, ६३.
५. सत्याचे प्रयोग, मो.क.गांधी, माणीक प्रकाशन, कोल्हापुर.
६. गांधी विचार, डॉ. चव्हाण, डॉ.भिसे, प्रा. जवळगे, प्रा. हट्टेकर(संपा.) निर्मल प्रकाशन, नांदेड २०११
७. केशरस्मृती, स्मरणीका, राष्ट्रीय परिषद, कला वाणिज्य महाविद्यालय परळी वैजनाथ
८. दै. देशोन्नती २६/१२/२०१२ लोकशाही स्वातंत्र्याची दशा व दिश, ॲड. य.बा. फडणीस.
९. गांधी तत्वज्ञान आणि भारतीय लोकशाही संपादक, डॉ. चव्हाण, डॉ. भिसे, प्रा. जवळगे, डॉ. हट्टेकर, अवुन पब्लीकेशन, दिल्ली २०१३.
१०. www.gandhianthoyghts.com.


❑❑❑


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani